MHDH050005682012

दाखल दिनांक : १४.०६.२०१२
नोंदणी दिनांक : १४.०६.२०१२
निकाल दिनांक : ०४.०७.२०२६
कालावधी : १४ व. ०० म. २० दि.

**साक्री येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी : मुग्धा एम. गांगुर्डे )**

**नियमीत फौजदारी खटला क्र.१०६/२०१२**
**निशाणी ११४**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा,<br>निजामपुर पोलीस स्टेशन गु.र.नं.९९/२०११. |
| **अभियोगपक्षा करीता विधिज्ञ** | सहायक सरकारी अभियोक्ता –<br>श्री.सी.बी.वळवी. |
| **आरोपी** | १. नाना लालसिंग जाधव,<br>**वय :** ५४ वर्षे, **व्यवसाय :** शेती,<br>२. रमेश चंदु भिल,<br>**वय :** ५५ वर्षे, **व्यवसाय :** शेती,<br>३. तानकु तुकाराम भिल,<br>**वय :** ४४ वर्षे, **व्यवसाय :** शेती,<br>४. युवराज चंदु भिल,<br>**वय :** ३९ वर्षे, **व्यवसाय :** शेती,<br>**सर्व रा. :** ऐंचाळे, ता.साक्री, जि.धुळे, |
| **आरोपीकरीता विधिज्ञ** | श्री.आर.बी.सूर्यवंशी. |

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्ह्याचा दिनांक | २१.१०.२०११. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २२.१०.२०११. |
| दोषारोपपत्र दिनांक | १४.०६.२०१२. |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०५.०८.२०१४. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८.०१.२०१७. |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | लागू नाही. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | ०४.०७.२०२६. |
| शिक्षा दिल्याचा दिनांक असल्यास | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सुटल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष मुक्तता/ शिक्षा | दिलेली शिक्षाा | फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला न्यायाधीन बंद कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाना लालसिंग जाधव | ०१.११.११ | ०१.११.११ | भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. | निरंक | निरंक |
| २. | रमेश चंदु भिल | ०१.११.११ | ०१.११.११ | | वरील प्रमाणे | निरंक | निरंक |
| ३. | तानकु तुकाराम भिल | ०१.११.११ | ०१.११.११ | | वरील प्रमाणे | निरंक | निरंक |
| ४. | युवराज चंदु भिल | ०१.११.११ | ०१.११.११ | | वरील प्रमाणे | निरंक | निरंक |

## भाग – क
## अभियोगपक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिगंबर नवल नवरतन | फिर्यादी | ३६ |
| २. | गोजाबाई दिगंबर नवरतन | जखमी/प्रत्यक्षदर्शी | ३८ |
| ३. | राजु भटा साबळे | प्रत्यक्षदर्शी | ३९ |
| ४. | भैया सुभाष भामरे | घटनास्थळ पंच | ८६ |
| ५. | निंबा दगा पाटील | जप्ती पंच | ९८ |
| ६. | बाळु चिल्या भिल | प्रत्यक्षदर्शी | १०७ |

## भाग – ड
## अभियोगपक्षातर्फे सादर झालेला दस्त पुरावा

| अ.क्र. | वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १. | फिर्याद | ३७ |
| २. | जप्ती पंचनामा | ९९ |

## भाग – इ
## अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर आलेला मुद्देमाल

| अ.क्र. | वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १. | एक आडजातीची काठी सुमारे साडेतीन फुट लांबीची. | **आर्टीकल–अ** |
| २. | एक आडजातीची काठी सुमारे चार फुट लांबीची. | **आर्टीकल–ब** |

## न्यायनिर्णय
## (दिनांक ०४ जुलै, २०२६ रोजी घोषित केला )

. आरोपींविरुध्द **भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४** अन्वये अपराध केल्याबाबत प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे

२. दिनांक २१.१०.२०११ रोजी रात्री २०.०० वाजेचे सुमारास ऐंचाळे गावातील भिलाटीत फिर्यादी यांचे रहाते घरासमोर आरोपी तुकाराम तानकु हा शिवीगाळ करित असतांना फिर्यादी यांनी त्यास कोणास शिवीगाळ करतो असे विचारल्याचे वाईट वाटुन आरोपी यांनी फिर्यादीस वाईट शिवीगाळ करुन आरोपी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यावर आणि फिर्यादीची पत्नी गोजाबाई हिचे पायावर मारुन ईच्छापूर्वक दुखापती केले तसेच, फिर्यादीस हाताबुक्क्यांनी मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून सदर घटनेबाबत फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद गु.र.क्र.९९/२०११ दाखल करुन पोहेकॉ/९९ दगा गंगाराम चकोर, निजामपुर पोलीस स्टेशन, यांनी गुन्ह्याचा सखोल तपास केला व आरोपींविरुध्द पुरावा सबळ मिळून आल्यामुळे दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द **भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४** अन्वये **निशाणी २५** अन्वये दोषारोप ठेवण्यात आले असता आरोपींनी दोषारोप नाकारुन संपरिक्षेची विनंती केली. आरोपींविरुध्द अभिलेखावर पुरावा आल्याने त्यांचे **फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३** अन्वयेचे निवेदन **निशाणी ११३** अन्वये नोंदविण्यात आले असता, आरोपींनी खोटी केस केल्याचे सांगितले. आरोपींनी त्यांच्या बचावाकरिता कोणताही तोंडी पुरावा दिला नसून साक्षीदार तपासले नाही. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. अभियोग पक्षाने दिलेला साक्षीपुरावा लक्षात घेता, खालील मुद्दे निर्णयाकरीता उपस्थित केले असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत येणेप्रमाणे दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २१.१०.२०१० रोजी २०.०० वाजेचे सुमारास आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास वाईट शिवीगाळ करुन आरोपी क्र.१ व ३ | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | यांनी त्यांच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यावर व फिर्यादीच्या पत्नीच्या पायावर मारुन स्वेच्छेने गंभिर दुखापती केले तसेच, फिर्यादीस हाताबुक्क्यांनी मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? | |
| २. | उपरोक्त घटनेच्या आधारावर आरोपींनी **भारतीय दंड विधानेच कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? | **नाही** |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता</u>**

**५.** प्रस्तुत मुद्दयांच्या अनुषंगाने सर्व प्रथम हे नमूद करणे आवश्यक आहे की, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने सरतपासादरम्यान सांगितले की, त्याचे शिक्षण झालेले नाही. त्याला लिहिता वाचता येत नाही. आरोपींना तो ओळखतो. आरोपी त्यांच्या गावातील रहिवाशी आहेत. त्याच्यासोबत त्याची पत्नी गोजाबाई, दोन मुली व एक मुलगा असे राहणेस आहे. घटना पाच ते सहा वर्षापूर्वी रात्री ०८.०० वाजेचे सुमारास त्याच्या घरासमोर घडली. त्यावेळेस तो घरासमोरील अंगणात बसला होता. त्यावेळी तानकु तुकाराम याने त्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी तो तानकु तुकाराम यास म्हटले की, शिवीगाळ करु नकोस. तानकु तुकाराम याने त्याचे ऐकले नाही. तानकु तुकाराम याने काठीच्या सहाययाने त्याच्या पाठीवर, डोक्यावर, उजव्या हाताच्या खांदयावर मारहाण केली.

**६.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने सरतपासादरम्यान पुढे सांगितले की, त्यावेळी नाना तेथे आला व नानाने देखील काठीच्या सहाययाने त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजुस मारहाण केली. त्याची पत्नी भांडण सोडविण्यास आली असता तिला देखील रमेश व युवराज यांनी हाताबुक्क्यांनी

मारहाण केली. रात्री गाडी नसल्याने दुस–या दिवशी त्याने निजामपुर पोलीस स्टेशन येथे घटनेची फिर्याद **निशाणी ३७** अन्वये दिली. त्याला मारहाण झाल्याने निजामपुर पोलीसांनी त्याला धुळे येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठविले होते. ज्या काठयांनी त्याला मारहाण झाली त्या **आर्टीकल–अ व ब** वरील काठया त्याने ओळखल्या.

७. आरोपीपक्षातर्फे उलट तपासादरम्यान फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने मान्य व कबुल केले की, त्याचे घर गावाच्या मधोमध असून त्याच्या घराच्या आजुबाजुला वस्ती आहे, तानकु याने शिवीगाळ केल्यानंतर तेथे लोक जमा झाले होते, किती होते हे सांगता येणार नसून तानकु नंतर नाना पाच मिनीटांनी आला, त्याला काठीने मारहाण झाल्यामुळे तो बेशुध्द पडला होता, नानाने मारल्यानंतर बेशुध्द पडला होता, त्यानंतर, काय घडले हे त्याला सांगता येणार नाही, दुस–या दिवशी त्याला समजले की, त्याला कोणी कोणी मारले होते, त्याच्या घराच्या शेजारी विजेचा खांब नव्हता, अंधारामध्ये कोणी काय केले हे त्याला सांगता येणार नाही, **आर्टीकल–अ व ब** वरील काठी कोठेही सहज उपलब्ध होतात. मात्र, आरोपी व त्यांच्यामध्ये निवडणुकीवरुन वाद होते असा अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेला सुचक प्रश्न फिर्यादीने तंतोतंत नाकारला. आरोपींतर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले.

८. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.२) हिने सरतपासादरम्यान सांगितले की, तिचे शिक्षण झालेले नाही. तिला लिहिता वाचता येत नाही. फिर्यादी दिगंबर हे तिचे पती आहेत. आरोपींना ती ओळखते. आरोपी त्यांच्या गावात त्यांच्या गल्लीत राहणेस आहे. तिचेसोबत तिचे पती, एक मुलगा व दोन मुली राहणेस आहेत. घटना पाच ते सहा वर्षापूर्वी रात्री ०८.०० वाजेचे सुमारास त्यांच्या घराचे समोर अंगणात घडली होती. घटनेच्या वेळेस ती घरात होती. अंगणात तिचे पती बसलेले होते. तानकु याने तिचे पतीस शिवीगाळ केली. त्यावेळी तिचे पती तानकु यास शिवीगाळ करु नको असे म्हणाले होते. त्यावेळी आवाज आल्यामुळे ती

घराचे बाहेर आली. नाना आणि तानकु यांनी काठीच्या सहाययाने तिचे पतीस डोक्याचे मागील बाजुस व उजव्या हाताच्या खांदयावर मारहाण केली.

९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.२) हिने सरतपासादरम्यान पुढे सांगितले की, तिने भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला असता नाना व तानकु यांनी काठीच्या सहाययाने पायावर पुढील बाजुस मारहाण केली. त्यावेळी रमेश व युवराज तेथे आले व हाताबुक्क्यांनी तिला व तिचे पतीस मारहाण केली. रात्री गाडी नसल्याने दुस–या दिवशी ते निजामपुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यास गेले होते. तिचे पतीने फिर्याद नोंदविली होती. मारहाणीमुळे तिचे पतीच्या डोक्यातुन रक्त निघाले होते. त्यामुळे, त्यांना पोलीसांनी धुळे येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठविले होते. ज्या काठयांनी तिला व तिचे पतीस माहराण झाली होती त्या काठया तिने **आर्टीकल–अ व ब** ओळखल्या.

१०. आरोपीपक्षातर्फे उलट तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.२) हिने मान्य व कबुल केले की, तिच्या मोठया मोठया मुलीचे नाव गोडबाई व मुलाचे नाव राजु आहे, दुस–या मुलीचे नाव सोनीबाई आहे, गोडबाईचे लग्न झाले आहे, घटनेच्यावेळी गोडबाई त्यांच्यासोबतच होती, गोडबाईचे सासरे त्यांच्याकडे आले होते, घटनास्थळी लोकांची गर्दी झाली होती, राजु भटा पाटील, राजु दिगंबर, आशाबाई आणि भालु हे सुध्दा भांडण सोडविण्यास आले होते, मारहाणीने तिचे पती बेशुध्द पडले होते, राजु भटा याचे घर तिचे घरापासून ब–याच अंतरावर आहे, ज्या वेळेस ती घराबाहेर आली त्यावेळेस चारही आरोपी होते, चारही आरोपी एकाच वेळेस मारहाण करित होते.आरोपींतर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने सरतपासादरम्यान सांगितले की, राजु भटा पाटील हे देखील त्यांचेच नाव आहे. त्याच्या पत्नीचे नाव पुष्पाबाई आहे. फिर्यादी दिगंबर माळी यास तो ओळखतो. तो त्यांच्या गावात राहतो. तो आरोपींना देखील ओळखतो. आरोपी त्यांच्या गावात राहतात.

फिर्यादी व आरोपी एकाच गल्लीत राहणेस आहेत. त्याचे शिक्षण ०७ वी पास पर्यंत झालेले आहे. त्याला लिहिता वाचता येते. चार ते पाच वर्षापूर्वी दिगंबरच्या घराजवळ रात्री ०८.३० ते ०८.४५ च्या सुमारास घटना घडली होती. त्याची वासरे हरविलेली होती ते शोधण्यास तो गेला होता तेव्हा तेथे दिगंबर व नाना आणि तानकु यांच्यात भांडण व शिवीगाळ चालू होती. दिगंबर व नाना आणि तानकु हे एकमेकांना शिवीगाळ करित होते. त्याने सदर भांडण सोडविले. त्यानंतर काय झाले हे त्याला माहित नसल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले. उपरोक्त नमूद पुराव्याच्या आधारावर असे दिसून येते की, प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून अभियोगपक्षाने उपरोक्त साक्षीदाराचा उलट तपास घेतला.

**१२.** अभियोगपक्षातर्फे उलट तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने मान्य व कबुल केले की, दिनांक २१.१०.२०११ रोजी घटना घडली आहे. तसेच, अभियोगपक्षाचे कथन की, आरोपी नाना व तानकु यांनी दिगंबर व गोजाबाईला काठीच्या सहायकाने मारहाण केली होती व रमेश व युवराज यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती, असे सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले. दिगंबर याचे डोके फुटले होते की नाही याबाबत त्याला माहिती नसून पोलीस त्याच्याकडे चौकशीकरिता आले होते, मात्र, त्याच्या जबाबातील मजकुर पोलीसांनी का लिहून घेतला हे त्याला सांगता येणार नाही. आरोपीतर्फे उपरोक्त साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला.

**१३.** आरोपीपक्षातर्फे उलट तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने कथन केले की, घटनास्थळी विज होती की नाही हे त्याला सांगता येणार नसून फिर्यादी व आरोपी यांच्या वस्तीमध्ये विजेचा खांब नाही. आरोपींतर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले.

**१४.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले घटनास्थळ पंच भैया (सा.क्र.४) याने सरतपासादरम्यान सांगितले की, दिनांक २२.१०.२०१२ रोजी पोलीसांनी त्याला कोठेही बोलावले नव्हते. पोलीसांनी त्याच्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. पोलीसांनी त्याची फक्त सही घेतली. त्याव्यतिरिक्त त्याच्यासमोर काहीही केले नाही.

उपरोक्त नमूद पुराव्याच्या आधारावर असे दिसून येते की, घटनास्थळ पंच भैया (सा.क्र.४) याने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून अभियोगपक्षाने उपरोक्त पंच साक्षीदाराचा उलट तपास घेतला.

**१५.** अभियोगपक्षातर्फे उलट तपासादरम्यान घटनास्थळ पंच भैया (सा.क्र.४) याने दिनांक २२.१०.२०१२ रोजी साक्षीदार राजु दिगंबर नवरतन याने घटनास्थळ त्याच्यासमक्ष पोलीसांना दाखवले आणि त्याच्यासमक्ष गुन्हयाची हकीगत त्याला व पोलीसांना सांगीतली, सदरचे घटनास्थळ त्याने बघीतले असता पूर्वेला मोकळी जागा होती, पश्चिमेला दिगंबर नवरतन याचे राहते घर होते, दक्षिणेला मोकळे पटांगण होते व दुर अंतरावर रमेश चंदु याचे राहते घर होते व उत्तरेला गावाबाहेर जाणारा दक्षिण–उत्तर रस्ता होता, पोलीसांनी त्याच्यासमक्ष चतु:सिमा दाखवुन पंचनामा लिहून घेतला व त्याला वाचून दाखविला म्हणून त्याने सही केली असे अभियोगपक्षाचे कथन तंतोतंत नाकारले. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला नाही.

**१६.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले जप्ती पंच निंबा (सा.क्र.५) याने सरतपासादरम्यान सांगितले की, दिनांक ०१.११.२०११ रोजी पोलीसांनी त्याला ऐंचाळे येथे पंच म्हणून बोलावले होते. पोलीसांनी तेथे त्याच्यासमक्ष भांडणाचा पंचनामा तयार केला. पोलीसांनी तेथे काठया जप्त केल्या व त्याचा पंचनामा **निशाणी ९९** अन्वये केला. सदरच्या **आर्टीकल–अ व ब** वरील काठया त्याने ओळखल्या.

**१७.** आरोपीपक्षातर्फे उलटतपासादरम्यान जप्ती पंच निंबा (सा.क्र.५) याने मान्य व कबुल केले की, पोलीसांनी त्याला सदर पंचनामा वाचून दाखविला होता, पंचनाम्याच्या ठिकाणी पाच ते सात लोक होते, त्या लोकांची नावे त्याला सांगता येत नसून तो ऐंचाळे येथे असतांना पोलीसांनी त्याला बोलावुन घटनास्थळी नेले, **आर्टीकल–अ व ब** वरील काठया दिगंबर भिल यांनी पोलीसांना दिल्या, दुस–या पंचाचे नाव त्याला सांगता येत नाही. आरोपींतर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले.

**१८.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी बाळु (सा.क्र.६) याने

सरतपासादरम्यान सांगितले की, फिर्यादी हा त्याचा मेहुणा असून तो आरोपींना ओळखतो. दिनांक २१.१०.२०११ रोजी रात्री ११.०० वाजता तो त्याच्या घरी होता. त्या दिवशी त्याला त्याच्या बहिणीच्या घरुन भांडणाचा आवाज आला. त्यानंतर तो त्याच्या बहिणीच्या घरी गेला. त्यावेळी आरोपी नाना लालसिंग आणि तानकु तुकाराम यांच्या हातामध्ये काठी होती. त्यांनी त्याच्या मेहुण्यास काठीने मारले. तसेच, त्याच्या बहिणीला पायावर आणि मांडीवर काठीने मारले. त्यानंतर सदरचे भांडण त्याने सोडविले. आरोपींनी काठीव्यतिरिक्त कशानेच मारले नव्हते. त्याच्या बहिणीस आणि मेहुण्यास ज्या काठयांनी मारले त्या काठया **आर्टीकल–अ व ब** त्यांनी न्यायालयात ओळखल्या.

१९.    आरोपीपक्षातर्फे उलटतपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी बाळु (सा.क्र.६) याने मान्य व कबुल केले की, आरोपी त्याच्याच गावाचे आहेत, तो घटनास्थळी जाईपावेतो भांडण होवुन गेलेले होते, भांडणाचा आवाज आला म्हणून तो तेथे गेला होता, त्याठिकाणी २५ ते ३० लोक होते, अंधार असल्यामुळे तो त्या लोकांची नावे सांगू शकत नाही, त्याच्याव्यतिरिक्त घटनास्थळी राजु भटा होता, राजु भटा शाहु वस्तीचा आहे, भांडण झाले त्यावेळी अंधार होता, त्यामुळे, कोणी कोणास मारले हे त्याला सांगता येणार नाही. आरोपींतर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न सदर साक्षीदाराने तंतोतंत नाकारले.

२०.    अभिलेखावर आलेला उपरोक्त साक्ष पुरावा, दस्त पुरावा, न्यायिक तराजुत तोलणे व मोजणे आवश्यक आहे. एकंदरीत, साक्ष पुरावा व दस्त पुरावा लक्षात घेता, या ठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, कोणत्याही गुन्ह्याची सिध्दता होण्याकरिता प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व पंच साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर असणे आवश्यक असते. पंच साक्षीदार तसेच इतर स्वतंत्र साक्षीदार हे खटल्याच्या सिध्दतेकरीता महत्वाचे दुवे असतात.

२१.    प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने घटनास्थळ पंच म्हणून भैया (सा.क्र.४) यास तपासले असता, दिनांक २२.१०.२०१२ रोजी पोलीसांनी त्याच्यासमक्ष

घटनास्थळ पंचनामा कारवाई करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला व सदर कारवाईदरम्यान सदरचा साक्षीदार हा पंच साक्षीदार म्हणून हजर होता असे अभियोगपक्षाचे कथन सदर साक्षीदाराने तंतोंतत नाकारला आहे. परिणामी, घटनास्थळ पंचनामा अभिलेखावर आलेला नाही.

२२. तसेच, जप्ती पंच निंबा (सा.क्र.५) यास अभियोगपक्षाने तपासले असता दिनांक ०१.११.२०११ रोजी पोलीसांनी त्याच्यासमक्ष **निशाणी ९९** अन्वयेचा जप्ती पंचनामा करुन **आर्टीकल–अ व ब** वरील दोन काठया त्याच्या समक्ष जप्त केल्याचे कथन केले. तसेच, उलटतपासादरम्यान, सदर जप्ती पंच साक्षीदार जप्ती पंचनामा कारवाईबाबत त्याच्या साक्षपुराव्यावर ठाम राहिला. परिणामी **निशाणी ९९** अन्वयेचा जप्ती पंचनामा सबळ पुराव्यानिशी सिध्द झाला व ज्या दोन काठयांनी तथाकथित मारहाण झाली त्या दोन काठया अभिलेखावर **आर्टीकल–अ व ब** वर आहेत.

२३. तसेच, फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने सरतपासादरम्यान घटनेबाबत कथन करुन सांगीतले की, घटना रात्री ०८.०० वाजेचे सुमारास घडली व सदर घटनेमध्ये आरोपी तानकु व आरोपी नाना यांनी फिर्यादीस काठीने मारहाण करुन शिवीगाळ केली व आरोपी रमेश व युवराज यांनी फिर्यादीस हाताबुक्कयांनी मारहाण केल्याचे सरतपासादरम्यान कथन केले. मात्र, उलटतपासादरम्यान फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने मान्य व कबुल केले की, त्याला काठीने मारहाण झाल्यामुळे तो बेशुध्द पडला होता व त्यानंतर काय घडले हे त्याला सांगता येणार नाही व दुस–या दिवशी त्याला समजले की, कोणी कोणाला मारले, तसेच, अंधारामध्ये कोणी काय केले हे त्याला सांगता येणार नाही.

२४. तसेच, प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.३) हिने सरतपासादरम्यान कथन केले की, घटना रात्री ०८.०० वाजेचे सुमारास त्यांच्या घराच्या समोर अंगणात घडली त्यावेळी फिर्यादी तेथे बसला होता व तानकु याने फिर्यादीस शिवीगाळ केली व आवाज आल्यामुळे ती घराबाहेर आली व तिने पाहिले की, नाना आणि तानकु हे फिर्यादीस काठीने मारहाण करित आहे. सदरचे भांडण तिने सोडविले असता तिला

देखील आरोपींनी मारहाण केल्याचे कथन केले.

**२५.** तसेच, प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने सरतपासादरम्यान कथन केले की, तो फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो व घटनेदिवशी तो त्याची हरविलेली वासरे शोधण्यास गेला असता त्याने पाहिले की, आरोपी व फिर्यादी यांच्यात भांडण व शिवीगाळ चालू होती व आरोपी आणि फिर्यादी हे एकमेकांना शिवीगाळ करित होते व सदरचे भांडण त्याने सोडविले, त्यानंतर काय झाले हे त्याला माहिती नसल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले. तसेच, घटनेदिवशी आरोपी नाना व तानकु यांनी फिर्यादी दिगंबर व जखमी गोजाबाई यांना काठीने मारहाण केली व आरोपी रमेश व युवराज यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सदर प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने तंतोतंत नाकारले व सदर मारहाणीमुळे फिर्यादी दिगंबर याचे डोके फुटले होते की नाही याबाबत त्याला माहिती नसल्याचे कथन केले.

**२६.** तसेच, प्रत्यक्षदर्शी बाळु (सा.क्र.६) याने सरतपासादरम्यान घटनेबाबत सांगीतले. मात्र, उलटतपासादरम्यान सदर प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने मान्य व कबुल केले की, तो घटनास्थळी जाईपावेतो भांडण होवुन गेले होते, भांडणाचा आवाज आला म्हणून तो तेथे गेला होता, त्याठिकाणी २५ ते ३० लोक होते, अंधार असल्यामुळे तो त्या लोकांची नावे सांगू शकत नाही व कोणी कोणास मारले हे त्याला सांगता येणार नाही.

**२७.** उपरोक्त अभिलेखावर आलेला अभियोगपक्षातर्फे एकंदरीत साक्षपुरावा व दस्त पुरावा न्यायीक तराजुत तोलल्यास व मोजल्यास असे दिसून येते की, घटना जेथे झाली ते घटनास्थळ शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनामा अभिलेखावर आणलेला नसून तो शाबित केलेला नाही. मात्र, अभियोगपक्षाने तथाकथित मारहाण ज्या दोन काठयांमुळे झाली ही बाब सिध्द करण्यासाठी **निशाणी ९९** अन्वये जप्ती पंचनामा शाबित केला असून **आर्टीकल–अ व ब** वरील मुद्देमाल दोन काठया अभिलेखावर आणून शाबित केले आहे.

**२८.** तसेच, घटनेबाबत फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) व प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.२) यांनी साक्षपुराव्यादरम्यान घटनेबाबत कथन केले असले तरी

प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) याने साक्षपुराव्यादरम्यान कथन केले की, फिर्यादी व आरोपी हे ऐकमेकांना शिवीगाळ करित होते व सदरचे भांडण त्याने सोडविले व त्यानंतर काय झाले हे त्याला माहित नसल्याचे त्याने कथन केले. तसेच, अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे दिनांक २१.१०.२०११ रोजी आरोपींनी फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) व प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई(सा.क्र.२) यांना काठीच्या सहाययाने व लाथाबुक्कयांनी मारहाण केल्याचे तंतोतंत नाकारले. तसेच, दिगंबर याचे डोके फुटल्याचे माहिती नसल्याचे कथन केले. तसेच, प्रत्यक्षदर्शी बाळु (सा.क्र.६) याने साक्षपुराव्यादरम्यान सांगीतले की, तो भांडण होवुन गेल्यानंतर घटनास्थळी गेला व अंधार असल्यामुळे कोणी कोणास मारले हे त्याला सांगता येणार नसल्याचे कथन केले.

**२९.** परिणामी, फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) व प्रत्यक्षदर्शी/जखमी गोजाबाई (सा.क्र.२) यांनी घटनेबाबत सरतपासादरम्यान सांगीतले असले तरी, प्रत्यक्षदर्शी राजु (सा.क्र.३) आणि प्रत्यक्षदर्शी बाळु (सा.क्र.६) यांनी सदरच्या घटनेस दुजोरा न देता अभियोगपक्षाच्या कथनास सहायय केलेले नाही. मुख्य म्हणजे तथाकथित मारहाणीमुळे फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) यास झालेल्या जखमा सिध्द करणेकामी अभियोगपक्षाने वैद्यकीय पुरावा अथवा वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष अभिलेखावर आणलेली नाही. तसेच, तपासी अधिकारी यांना देखील अभियोगपक्षाने तपासलेले नाही. परिणामी **निशाणी ३७** अन्वेची फिर्याद व **निशाणी ९९** अन्वेचा जप्ती पंचनामा व **आर्टीकल–अ व ब** वरील मुद्देमाल दोन काठया अभिलेखावर आले असले तरी घटना, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा आणि अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द केलेले दोषारोप सबळ पुराव्यानिशी संशयापलीकडे जावुन सिध्द केले नाही.

**३०.** उपरोक्त चर्चेच्या आधारावर दिनांक २१.१०.२०१० रोजी २०.०० वाजेचे सुमारास आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास वाईट शिवीगाळ करुन आरोपी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यावर व फिर्यादीच्या पत्नीच्या पायावर मारुन स्वेच्छेने गंभिर दुखापती केले तसेच, फिर्यादीस हाताबुक्कयांनी मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली, या व अशा

अशायाचे दोषारोप सबळ पुराव्यानिशी संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही. जोपर्यंत आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द होत नाही तो पर्यंत कायदा आरोपीस निरपराध समजतो. आरोपींचा तो संविधानात्मक हक्क आहे. त्यामुळे वरील परिस्थितीत आरोपींना संशयाचा फायदा देऊन त्यांना निर्दोष मुक्त करणे न्यायिक, उचित व क्रमप्राप्त आहे. म्हणून **मुद्दे क्र.१ आणि २** चे उत्तर **नकारार्थी** देत. परिणामी, **मुद्दा क्र.३** करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी क्र.**१.** नाना लालसिंग जाधव, **२.** रमेश चंदु भिल, **३.** तानकु तुकाराम भिल आणि **४.** युवराज चंदु भिल यांची **फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २४८(१)** अन्वये **भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्ता करण्यात येत आहे.

**२.** सर्व आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

**३.** सर्व आरोपींनी प्रस्तुत न्यायनिर्णयावर अपील झाल्यास, अपीलमध्ये हजर होण्यासंदर्भात **फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ)** अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) चे बंधपत्र दाखल करावे.

**४.** गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एक आडजातीची काठी सुमारे साडेतीन फुट लांबीची आणि एक आडजातीची काठी सुमारे चार फुट लांबीची ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर त्याचा नाश करण्यात यावा.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**

MUGDHA MUKUND GANGURDE
Digitally signed by MUGDHA MUKUND GANGURDE
Date: 2026.07.04 15:05:29 +0530

साक्री,
दिनांक : ०४.०७.२०२६.

**(मुग्धा एम. गांगुर्डे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री**